# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मौजे कशेळी (ता.राजापूर) येथील वायगुंड बंधाऱ्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(१) १४१० (२२-१२-२०१४). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कशेळी (ता.राजापूर) येथील वायगुंड बंधारा पुरामध्ये फुटल्यामुळे शेती व संबंधित वाडीशी संपर्क तुटला असून सदर बंधाऱ्याची अद्याप दुरुस्ती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची सार्वजनिक बांधकाम विभाग व खारभूमी विभाग दरसूची सन २०११-१२ नुसार रु.२४.७५ लक्ष इतकी होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर काम जिल्हापरिषद बांधकाम विभाग यांना देण्याचे निश्चीत होऊनही अद्याप विभागामार्फत कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीनुसार सदर बंधाराच्या बांधकामासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०५-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) नाही.

जिल्हाधिकारी यांचे दालनात दि.७.७.२०१२ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर काम जिल्हा परिषद बांधकाम विभाग, रत्नागिरी यांच्याकडून करण्याचे निश्चित केले होते. तथापि, याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून बैठकीचे इतिवृत्त निर्गमित झाले नाही. त्यामुळे पुढील कार्यवाही होऊ शकली नाही.

यानंतर जिल्हाधिकारी यांचे दालनात दि.१३.७.२०१५ रोजी पुन:श्च आयोजित बैठकीमध्ये स्थानिक ग्रामस्थांची संमत्ती असल्यास सदर काम महाराष्ट्र रोजगार योजनेअंतर्गत ग्रामपंचायती मार्फत प्रस्तावित करण्यात यावे असे ठरले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) सदर बंधारा जलसंपदा विभागाकडील नसल्याने जलसंपदा विभागास दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करता येणार नाही. ग्राम सभेने निर्णय घेतल्यास सदर दुरुस्ती कामास महाराष्ट्र रोजगार योजनेंतर्गत निधीची तरतूद करण्यात येईल.

---

**जळगांव जिल्हा परिषद येथे बांधकाम विभागातील नैमत्तिक दुरुस्तीच्या कामासाठीच्या निधीबाबत**

**(२) ११२८४ (०६-०४-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हा परिषद येथे बांधकाम विभागात सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये नैमत्तिक दुरुस्तीच्या कामासाठी किती निधी प्राप्त आहे,
(२) असल्यास, या निधीमधून किती व कोणकोणत्या कामाचे प्रस्ताव कार्यालयास प्राप्त झाले आहेत,
(३) असल्यास, यापैकी कोणकोणती कामे पूर्ण झाली आहेत,
(४) असल्यास, उर्वरित कामे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत व उक्त कामे पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०५-०१-२०१६) :**(१) नैमित्तिक दुरुस्तीच्या कामासाठी (३०५४-२४१९) जळगाव जिल्हा परिषदेस सन २०१३-१४ मध्ये रु. १७४.९४ लक्ष व सन २०१४-१५ मध्ये रु.१७८.६० लक्ष इतका निधी प्राप्त झाला आहे.
(२) उपरोक्त निधीमधून सन २०१३-१४ मध्ये २६२ कामांचे प्रस्ताव प्राप्त झाले त्यापैकी १३९ कामांना निधीच्या उपलब्धतेनुसार मंजूरी देण्यात आली. तसेच सन २०१४-१५ मध्ये ३०४ कामांचे प्रस्ताव प्राप्त झाले त्यापैकी १२५ कामांना निधीच्या उपलब्धतेनुसार मंजूरी देण्यात आली. सदर कामांची यादी प्रधान सचिव यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.
(३) यापैकी सन २०१३-१४ मधील १२१ कामे पूर्ण आहेत व सन २०१४-१५ मधील ६४ कामे पूर्ण आहेत. सदर कामांची यादी प्रधान सचिव यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.
(४) लागोपाठच्या सार्वत्रिक निवडणूका आदर्श आचार संहिता कालावधीत निविदा प्रक्रिया विलंबामुळे तसेच अवकाळी पावसामुळे कामे अपूर्ण राहिलेली आहेत. सदरची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

---

**संत तुकाराम महाराजांच्या तिर्थक्षेत्राच्या विकास आराखड्या अंतर्गतची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३) १५४६० (०८-०४-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जगद्गुरु संत तुकाराम महाराज चतुर्थ जन्म शताब्दी निमित्त तिर्थक्षेत्र विकासासाठी ५६० कोटी रुपयांचा आराखडा शासनाने मंजूर केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आराखड्यात अंतर्गत कोणत्या तिर्थक्षेत्रास किती निधी मंजूर करण्यात आला असून, मंजूर कामापैकी कोणत्या कामावर किती निधी खर्च झाला आहे,
(३) असल्यास, या आराखड्या अंतर्गत तिर्थक्षेत्र पंढरपूरसाठी मंजूर कामे कधीपर्यंत पूर्ण करण्यात येतील,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२३-१२-२०१५)** :(१) हे अंशत: खरे आहे,
शासन निर्णय दिनांक १२.९.२०१४ अन्वये श्री क्षेत्र देहू, आळंदी, पंढरपूर, भंडारा डोंगर, नेवासा, पालखीतळ/मार्ग आराखडयामध्ये रु.१०९४.८९ कोटी इतक्या शासन सहभागाच्या सुधारीत आराखडयास मान्यता देण्यात आली आहे.
(२) सदर आराखडयांतर्गत कोणत्या तिर्थक्षेत्रास किती निधी मंजूर करण्यात आला तसेच पंढरपूर येथील मंजूर कामापैकी कोणत्या कामावर किती निधी खर्च झाला या आकडेवारीचा तपशील प्रधान सचिव यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.
(३) या आराखडया अंतर्गत तिर्थक्षेत्र पंढरपूरसाठी मंजूर कामे दि.३०.०६.२०१६ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील महाराष्ट्र पाणलोट क्षेत्रातील पाणी महाराष्ट्राला मिळण्याबाबत**

**(४) १८२३५ (१४-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील महाराष्ट्र पाणलोट क्षेत्रातील पाणी महाराष्ट्राला मिळणेसाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी शासनास निवेदने दिलेली आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवदेनांच्या अनुषंगाने पिंजाळ धरणाचा व त्यापुढील कामाचा समावेश दमणगंगा-पिंजाळ या राष्ट्रीय प्रकल्पात करण्यासाठी तसेच दमणगंगा खो-यातील २८ अ.घ.फुट. पाणी गोदावरी खो-यात वळविण्यासाठी लिंक प्रस्ताव तयार करुन या प्रकल्पाला राष्ट्रीय प्रकल्प म्हणून केंद्र शासनास सादर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) तसेच नार-पार-गिरणा या प्रकल्पात तांत्रिक सुधारणा करुन हा प्रकल्प १९.५ अ.घ.फुट वरुन २९ अ.घ.फुट पर्यंत करुन या प्रकल्पाला नदी जोड योजनेतील राष्ट्रीय प्रकल्प म्हणून केंद्र शासनास सादर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२५-०५-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिनांक १.११.२०१० च्या पत्रान्वये दमणगंगा-पिंजाळ या नदी जोड प्रकल्पाचे पिंजाळ धरण ते पोगांव तानसा प्रकल्प पर्यंतची वहनव्यवस्था अंतर्भूत करण्याबाबतची विनंती केली होती. तथापि, पिंजाळ धरण ते तानसा धरण हे पाणी गुरुत्वाकर्षणाने (by gravity) पोहोचू शकत नाही. त्यामुळे पिंजाळ तानसा नदी जोड वगळण्यात आला. तद्नंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने पिंजाळ प्रकल्प ते पोगांव ही वहन व्यवस्था ५.३० मीटर व्यासाच्या गोलाकार बोगद्याद्वारे जोडण्याचे ठरविले व त्यानुसार तांत्रिक सल्लागाराची नेमणूक केली. त्यामुळे राष्ट्रीय जल विकास अभिकरणाने दमणगंगा-पिंजाळ योजना पिंजाळ धरणापर्यंतच मर्यादित केली आहे.

केंद्रीय जलसंसाधन मंत्री यांना दमनगंगा -पिंजाळ हा प्रकल्प राष्ट्रीय प्रकल्प म्हणून हाती घेण्यात यावा असे मा.मुख्यमंत्री यांचे दि.१६/०१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. त्याचप्रमाणे पार तापी नर्मदा या नदी जोड योजनेतील प्रकल्पातील ३०० द.ल.घ.मी. पाणी गिरणा उपखोऱ्यात वळविणे व उर्वरित राज्याच्या हिस्स्याच्या पाण्याची भरपाई तुटीच्या तापी खोऱ्यामध्ये व्हावी. तसेच ही योजना राष्ट्रीय प्रकल्प म्हणून हाती घ्यावी असेही दिनांक १६.१.२०१५ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

दमणगंगा (एकदरे) ते गोदावरी खोरे या राज्यांतर्गत नदी जोड प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल करण्याबाबतची विनंती शासनाचे पत्र दिनांक १२.३.२०१५ अन्वये राष्ट्रीय जल विकास प्राधिकरण यांना करण्यात आलेली आहे.

नार, पार, औरंगा, अंबिका खोऱ्यातील पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी पूर्वेकडे गिरणा खोऱ्यात वळविण्यासाठी तयार करण्यात आलेली उपसा जोड योजनेचे सविस्तर सर्वेक्षण व अन्वेषण करुन प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठीच्या रु.३.६३ कोटी किंमतीच्या अंदाजपत्रकास दि.२३.१२.२०१४ रोजी शासनाने प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

यानंतर केंद्रीय जलसंसाधन मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नदीजोड प्रकल्पाबाबतच्या विशेष समितीच्या झालेल्या दि.१४.५.२०१५ व दि.१३.७.२०१५ च्या बैठकीत राज्याच्या मागण्यांचा पाठपुरावा करण्यात आला.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालखेड डावा तट कालवा व खरीप कालवा आठमाही करण्याबाबत

**(५) १८२७५ (१७-०८-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालखेड डावा तट कालवा किमी ११० ते १२० व वितरीका क्र.४६ ते ५२ खरीप कालवा आठमाही करण्यासाठी यापूर्वी सादर केलेल्या प्रस्तावात पुन:श्च सुधारणा करुन शासनास सादर करण्याचा शासनाने दिनांक १९ मे, २०१४ रोजी वा त्या सुमारास निर्णय घेवूनही गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद यांनी अद्याप शासनास सुधारीत प्रस्ताव पाठविलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच उक्त कालवा आठमाही करण्यासाठी शासनास प्रस्ताव सादर करण्याची नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळास औरंगाबाद व लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कालवा आठमाही करण्यासाठी गेल्या काही दिवसापूर्वी शेतकऱ्यांनी केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कालवा आठमाही करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०४-२०१६) :**(१) नाही.

(२) होय.

मा.आमदार श्री.छगन भुजबळ यांनी दि. ५/११/२०१४ च्या पत्रान्वये सदर कालवा आठमाही करण्याबाबत मागणी केली आहे.

(३) नाही.

तथापि, दि. २६/११/२०११ रोजी लाभधारक शेतकऱ्यांनी आंदोलन केले होते.

(४) उर्ध्व गोदावरील खोरे हे तुटीचे खोरे असल्यामुळे व प्रकल्प अहवालात सदर कालवा खरीप कालवा असल्यामुळे सदरहू कालवा आठमाही करणे शक्य नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील घोणसरे फाटा ते चिवेली, वहाळ ते तोंडली पिलवली आणि वरी घेवडेवाडी ते वहाळ रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(६) १८३८५ (१७-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील घोणसरे फाटा ते चिवेली, वहाळ ते तोंडली पिलवली आणि वीर घेवडेवाडी ते वहाळ या तीन रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तीनही रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी निधी द्यावा अशी मागणी अनेक वर्षापासून संबंधितांकडे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रस्त्यांच्या डांबरीकरणासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०५-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

प्रश्नांकित तीन रस्त्यांपैकी घोणसरे फाटा ते चिवेली म्हणजेच मजरे कौंढर चिवेली रस्ता इजिमा ५२ व विर घेवडेवाडी ते वहाळ रस्ता म्हणजेच विर लोहारवाडी ते देवपाट घेवडेवाडी रस्ता ग्रा.मा.२०३ हे दोन रस्ते जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत असून वहाळ ते तोंडली पिलवली हा रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३५ दर्जाचा असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे.

घोणसरे फाटा ते चिवेली या रस्त्यावरील खड्डे रस्ता कामगारांमार्फत भरुन तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली असून एस.टी. वहातूक सुरळीत सुरु आहे.

(३) होय.

(४) व (५) मजरे कौंढर चिवेली या इतर जिल्हा मार्ग क्र.५२ या रस्त्याची एकूण लांबी ११.०० कि.मी. असून संपूर्ण रस्ता डांबरी पृष्ठभागाचा आहे. सदर रस्त्याच्या ३/०० ते ४/५०० कि.मी. लांबीतील मजबुतीकरण डांबरीकरण करण्याचे काम जिल्हा वार्षिक योजना आराखडा सन २०१५-१६ मध्ये मंजूर असून सदर काम निविदा स्तरावर आहे.

विर लोहारवाडी ते देवपाट घेवडेवाडी या ग्रामीण मार्ग क्र.२०३ रस्त्याची एकूण लांबी ४.०० कि.मी. असून त्यापैकी २.२०० कि.मी. डांबरीपृष्ठभागाची लांबी सुस्थितीत आहे. अत्यंत खराब झालेल्या खडी पृष्ठभागाचे मजबुतीकरण डांबरीकरण करण्याचा प्रस्ताव जिल्हा नियोजन समितीकडे जिल्हा परिषदेमार्फत दि.१६.५.२०१५ रोजी मंजूरीसाठी पाठविण्यात आला आहे. त्यास अद्याप मंजूरी प्राप्त नाही.

आंबिटगाव वहाळ वारेली तोंडली पिलवली शाखेसह रस्ता प्रमुख जिल्हा मार्ग क्र.३५ असून त्याची एकूण लांबी १९/६०० कि.मी. आहे. सदर लांबीपैकी १/४०० कि.मी. लांबीतील रस्ता दुरुस्तीचे काम मंजूर असून निविदा स्तरावर आहे. उर्वरीत खराब रस्त्याचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे नियोजन आहे.

---

## धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील १४८ गांवे पुररेषेत येत असतानाही पुररेषा आखणीसाठी विलंब होत असल्याबाबत

**(७) २२८१३ (०६-०८-२०१५). श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे व नंदूरबार जिल्ह्यातील १४८ गांवे पुररेषेत येतात तरीही शासनाकडून पुररेषा आखणीसाठी गेल्या ७ ते ८ वर्षापासून विलंब होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००७ पासून पुररेषेच्या आखणीचे काम दरवर्षी सुरू असून केवळ निधीअभावी हे पूर्ण होत नाही त्यामुळे दरवर्षी निधीच्या रकमेत वाढ होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षी निधीत वाढ होत असूनही पुररेषाच्या आखणीचे काम निधी अभावी पूर्ण होत नाही याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०२-२०१६)** :(१), (२) व (३) धुळे जिल्ह्यातील ६९ आणि नंदूरबार जिल्ह्यातील ५४ असे एकूण १२३ गावांचे पूर रेषा आराखडे तयार करणे आवश्यक आहे. ह्यापूर्वी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने जलसंपदा विभागाकडे मागणी नोंदविल्यानंतर व निधी उपलब्ध केल्यानंतर पुररेषा आराखडे जलसंपदा विभागामार्फत तयार करण्याची पध्दती प्रचलित होती.

तथापि मा.हरीत लवादाच्या दिनांक २७.३.२०१५ रोजीच्या आदेशाप्रमाणे पूररेषा आराखडले जलसंपदा विभागाने स्वत:च्या निधीतून तयार करावे, असे आदेश आहेत. जलसंपदा विभागाच्या महामंडळाकडे दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीतून पूररेषा आराखडे तयार करण्याचे निर्देश क्षेत्रिय कार्यालयांना शासनामार्फत दि. २०/०१/२०१६ च्या पत्रान्वये देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयात ६०.४० च्या प्रमाणानुसार विहिरीची कामे करण्याबाबत**

**(८) २३९४१ (१७-०८-२०१५). श्रीमती प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्हयात सन २००८ पासून एम.आर.जी.एस.ची १९ कोटी ६५ लाखांची ७ हजार ५२८ कामे झाली असून ६०.४० च्या प्रमाणानुसार कामे केली आहेत या योजनेअंतर्गत विहीरीची कामे घेण्यात यावीत अशी मागणी लोकप्रतिनिधी मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे केली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१६)** :(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सुमारे १८,३८२ इतकी कामे पूर्ण झाली असून त्यावर रु. २२१.७२ कोटी इतका खर्च झाला आहे, लोकप्रतिनिधी श्री.सिध्दाराम म्हेत्रे, माजी गृहराज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री व जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे अनुक्रमे दिनांक २१ फेब्रुवारी, २०१४ व दिनांक २३ सप्टेंबर, २०१४ रोजी निवेदन करुन विहिरीस मंजूरी देण्याबाबत मागणी केली आहे.

(२) व (३) निवेदनाच्या अनुषंगाने सन २०११-१२ व २०१२-१३ मधील ४८३ नवीन विहिरींपकी १९१ वैयक्तिक सिंचन विहीरींना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून उर्वरित २९२ वैयक्तिक विहिरींशी संबंधित लाभार्थी हे शासनाचे प्रचलित नियम व धोरणानुसार लाभास पात्र ठरत नसल्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही. तसेच लोकप्रतिनिधी यांनी मागणी केलेल्या सन २०१२-१३ मध्ये अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या २१७ विहिरींच्या दुरुस्तीसंदर्भात संबंधित लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत.

---

**डुक्करवाडी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील पाझर तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(९) २६१६० (१८-०८-२०१५). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डुक्करवाडी (ता.भूम, जि.उस्मानाबाद) येथील पाझर तलावाचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे त्याची चौकशी करणेबाबत परिसरातील विविध सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांद्वारे दिनांक ३० ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी, उस्मानाबाद, उपविभागीय अधिकारी, भूम, यांना लेखी निवेदनाद्वारे विनंती करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०४-०४-२०१६) :**(१), (२) व (३) अशा प्रकारचे निवेदन जिल्हाधिकारी उस्मानाबाद यांच्याकडे प्राप्त झालेले आहे. सदरहू पाझर तलावाबाबतची वस्तुस्थिती पुढील प्रमाणे आहे.

डुक्करवाडी पा.त.क्र. ४ ता.भूज जि.उस्मानाबाद चे काम दि. २५.०४.२००३ रोजी सुरु झाले असून कंदरभरणीचे काम जून २००९ मध्ये पूर्ण झालेले आहे व तेव्हा पासून प्रतिवर्षी पाणीसाठा होत आहे. दि. २५.०८.२०१४ ते दि. २९.०८.२०१४ या कालावधत सदर तलावाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये अतिवृष्टी झाली होती व त्यामुळे धरणाच्या जवळपास माथ्यापर्यंत पाणी आले होते व सांडव्यावरुन पुराचे पाण्याचा विसर्ग पुर्णपणे जात नसल्यामुळे धरण धोक्याचा अवस्थेत होते. त्यामुळे धरणाच्या खालील बाजूच्या गावांना व शेत जमिनींना धोका होण्याचा संभव होता. त्यामुळे अंदाजे १.०० मी. ने सांडवव्याची पाणी पातळी खाली करुन धरण सुरक्षित ठेवण्यात आले. दि. २६.०८.१४ ते ३०.०८.२०१४ या कालावधीत सतत पाऊस सुरु असल्यामुळे धरणाच्या D/S बाजुचा अंदोजे ५ मी x ५ मी x ०.६ मी भराव घसरल्यामुळे पडलेला खड्डा नंतर बुजवण्यात आला व धरण सुस्थितीत ठेवण्यात आले. भविष्यात सदर पाझर तलावाचे व्यवस्थतीत दुरुस्ती करण्याचे अंदाजपत्रक तयार करुन दुरुस्ती कामे करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खामगाव (जि.बुलढाणा) महाराष्ट्र रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणा-या कामगारांचे वेतन प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) २६१६९ (१७-०८-२०१५). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) महाराष्ट्र रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणा-या कामगारांचे वेतन तहसिलदार, खामगाव यांच्याकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ९ एप्रिल, २०१५ पासून ते आजपावेतो केलेल्या कामाची कामगारांची मजूरी अद्यापपर्यंत मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत महाराष्ट्र राज्य रोजंदारी वन कामगार कृती समितीने तहसिलदार, खामगाव यांना दिनांक १५ जून, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कामगारांची मजूरी त्यांना कधीपर्यंत देण्यात येणार आहे,
(५) असल्यास, कामगारांचे मजूरी प्रलंबित ठेवण्याचे कारण काय व त्यानुषंगाने तहसिलदारावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) मजुरांची मजूरी दि.२५.६.२०१५ पर्यंत त्यांच्या खात्यात जमा करण्यात आलेली आहे.
(५) तत्कालीन खामगांव तहसिलदार यांची बदली झाल्याने नवनियुक्त तहसिलदार यांची डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट (DSC Token) तयार होण्यास तांत्रिक अडचणीमुळे मजुरांची मजुरी अदा करता आली नाही. तद्नंतर तांत्रिक अडचण दूर होताच मजूरांची मजूरी विलंब शुल्कासह अदा करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील गांधारेश्वर मंदीर ते रेल्वे स्टेशन रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(११) २६३११ (३०-०७-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील गांधारेश्वर मंदीर ते रेल्वे स्टेशन या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे नागरीकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यांची सुधारणा व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०४-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रश्नांकित रस्त्याचे नाव सन २००१ २०२१ रस्ते विकास योजनेनुसार गुहागर चिपळूण कराड मुख्या रस्ता ते मार्कंडी स्वामी मठ गांधारेश्वर वालोपे रेल्वेस्टेशनला जोडणारा रस्ता असे असून सदर रस्ता ग्रामीण मार्ग क्र.५९ दर्जाचा आहे. या रस्त्याची एकूण लांबी १,२०० कि.मी. असून संपूर्ण पृष्ठभाग डांबरी आहे.

सदर रस्त्याची जिल्हा परिषदेमार्फत पहाणी करण्यात आली असून ०.४०० कि.मी. लांबीतील खराब रस्त्याच्या दुरुस्तीचे काम रस्ते विशेष दुरुस्ती कार्यक्रमातून निधी व निकष यांना अधनि राहून मंजूरीसाठी प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे प्रयत्न राहतील.

---

**रत्नागिरी जिल्हयातील साकवांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत**

**(१२) २८३४१ (१४-०१-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण):** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील अनेक वाड्या-वस्त्या व गावांना जोडणारे साकव मोठ्या प्रमाणात नादुरुस्त झाले असून मोडकळीस आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील किती साकवांची दुरुस्ती करणे आवश्यक आहे व याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यासाठी किती निधीची आवश्यकता आहे,

(४) असल्यास, उक्त साकव दुरुस्त करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०५-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) रत्नागिरी जिल्हयातील एकूण ६३४ साकवांची दुरुस्ती करणे आवश्यक असून त्यासाठी रु. १५७७.७५ लक्ष इतक्या निधीची आवश्यकता आहे.

(४) सन २००२-०३ पूर्वी जिल्हा परिषदांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडून साकव दुरुस्तीसाठी ३०५४ मार्ग पूल परिरक्षण व दुरुस्ती या योजनेत्तर संवर्गाखाली साकव दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध होत होता. परंतु सन २००२-२००३ पासून संवर्ग अ ब क ड मध्ये साकव ही बाब अंतर्भूत होत नाही.

सन २०१२-१३ या वर्षापासून जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग दर्जाच्या रस्त्यांची बांधकाम विभगाकडून ग्राम विकास विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय दि. १०.०९.२०१२ अन्वये जिल्हा परिषदेमार्फत इतर जिल्हा मार्ग व ग्रामीण मार्ग या रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीकरीता निधीचे वाटप करण्याबाबत कार्यपध्दती विशद केली आहे. त्यानुसार या योजनेत्तर कार्यक्रमासाठी गट अ ब क ड तयार केले असून गट ड मधील अन्य व संकिर्ण कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषदेने साकव दुरुस्तीचे काम करण्याचे नियोजन करणे अपेक्षित आहे.

संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार रत्नागिरी जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची एकूण

लांबी ८०८५.३५ कि.मी. इतकी आहे. रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमाअंतर्गत सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेस एकूण रु. ३७३३.८२ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये एकूण रु. ७६३.५८ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी रत्नागिरी जिल्हा परिषदेला रु. १७००.६३ लक्ष असा एकूण रु. ६१९८.०३ लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्वेतपत्रिकेतील शिक्षण फी सवलतीसाठी गठीत केलेला कार्यगट रद्द करण्याबाबत**

**(१३) २८४४२ (१४-०१-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवे निकष आणि पात्रता निश्चित करण्याच्या नावाखाली मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्तीला कात्री लावण्यासाठी शासनाने वित्तीय स्थितीबाबत प्रकाशित केलेल्या श्वेतपत्रिकेतील शिक्षण फी सवलत या मुद्द्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी दिनांक १ जुलै, २०१५ रोजी सचिवांचा कार्यगट गठीत केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यगट हा मागासवर्गीयांसाठी अन्यायकारक असल्यामुळे हा कार्यगट रद्द करणेची विविध लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने कार्यगट रद्द करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३१-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) अंशत: खरे असून या प्रकारचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) शासन निर्णय, वित्त विभाग, दि.१ जुलै, २०१५ अन्वये राज्य शासनाच्या वित्तीय स्थितीबाबत प्रकाशित केलेल्या श्वेतपत्रिकेतील शिक्षण फी सवलत या मुद्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यासाठी प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. विविध प्रवर्गातील व विविध अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने फी सवलती, शिष्यवृत्ती देण्याची कार्यवाही शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, आदिवासी विकास विभाग व अल्पसंख्यांक विकास विभाग इत्यादी विभागांकडून केली जाते. याबाबतच्या कार्यपध्दतीत सुसुत्रता आणणे, द्विरुक्ती टाळणे व शासकीय निधीचा अपव्यय टाळण्यासाठी सदर कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. शिष्यवृत्ती/फी सवलत बंद करण्याचा शासनाचा मानस नसून शिष्यवृत्तीचे धोरण तरुणांना अधिक उपयुक्त कसे ठरेल या मुद्यांच्या अनुषंगाने सदर कार्यगटाद्वारे कार्यवाही करण्यात येत आहे. सदर कार्यगट मागासवर्गीयांसाठी अन्यायकारक होणार नसल्याने कार्यगट रद्द करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जायकवाडी धरणात पाणी सोडल्यामुळे शेतक-यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(१४) २८४८७ (१४-०१-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर धरणातील पिण्याचे पाणी जायकवाडी धरणात सोडणे कामी कार्यकारी संचालक, गोदावरी विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास आदेश दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी संचालक यांच्या निर्णयामुळे नाशिक जिल्हातील शेतकरी पूर्णपणे उध्वस्थ होणार असून करोडो रुपयांचे बँकेचे कर्ज थकित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यकारी संचालक, गोदावरी विकास महामंडळ यांनी काढलेल्या आदेशामुळे होणा-या नुकसानीबाबत शेतक-यांना कशाप्रकारे नुकसान भरपाई शासन देणार आहे,

(४) तसेच याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०३-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दि.१९ सप्टेंबर, २०१४ च्या निवाड्यानुसार कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी दि.१७ ऑक्टोबर, २०१५ रोजी आदेश दिले आहेत.

(२), (३) व (४) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकर अधिनियम २००५ मधील कलम ११ (ग) मध्ये अवर्षण परिस्थितीमध्ये नदीखोऱ्यातील समन्यायी पाणी वाटप करणेची तरतूद केलेली आहे. या तरतूदीनुसार आवर्षण परिस्थितीमध्ये उर्ध्व गोदावरी नदी खोऱ्यातील विविध धरणामधील उपलब्ध पाण्याचे वाटप करण्याबाबत सविस्तर सुचना महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दि.१९/०९/२०१४ च्या आदेशानुसार दिलेल्या आहेत. त्यानुसार चालू वर्षी दि.१५/१०/२०१५ चा पाणीसाठा विचारात घेऊन कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी गंगापूर, मुळा, प्रवरा, गोदावरी दारणा, पालखेड या धरणसमूहातुन १२.८४ टीएमसी पाणी जायकवाडी धरणात सोडण्याचे आदेश दिले आहेत. सदरहु प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे विविध याचिका दाखल करण्यात आल्या असून त्या संदर्भातील सुनावण्या सुरु आहे. न्यायालयीन निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे जांभरूण (ता.जि.बुलढाणा) येथे ग्रामपंचायतीकडून नागरिकांना स्मशानभुमीची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१५) २८७५९ (१४-०१-२०१६). श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे जांभरूण, (ता.जि.बुलढाणा) येथील नागरी सुविधे अंतर्गत स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरिकांकडून अनेक वर्षापासून असलेल्या या मागणीकडे ग्रामपंचायतीकडून दुर्लक्ष केल्या जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबतची शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०५-२०१६) :**(१) होय हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) मौजे जांभरुण हे महसूली गाव ग्रा.पं. सागवन, ता.बुलढाणा अंतर्गत येते. मौजे जांभरुन येथे स्मशानभूमीसाइी शासकीय जागा उपलब्ध नसल्याने खाजगी जागा संपादीत करण्याबाबत ग्रा.पं. सागवन यांना तहसीलदार, ता.बुलढाणा यांनी दि.८.१२.२०१४ रोजी कळविण्यात आले आहे. त्यानुसार ग्रा.पं. सागवन यांनी नोटीस प्रसिध्द करुन गावामध्ये खाजगी मालक स्मशानभूमीसाठी जागा दान किंवा शासकीय बाजार भावाप्रमाणे देण्यास तयार असल्यास जागा द्यावी याबाबत प्रसिध्दी देण्यात आली होती. तथापि, अद्याप कोणीही खाजगी जागा देण्यास तयार झालेली नाही. याबाबत लोकसहभागातून तात्पुरती स्मशानभूमीची व्यवस्था करणेबाबत तसेच कायमस्वरुपी स्मशानभूमीची व्यवस्था करणेबाबत ग्रामपंचायतींना गट विकास अधिकारी, पंचायत समिती बुलढाणा यांचेमार्फत निर्देश देण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्हयात रोजगार हमी योजने अंतर्गत कामे वाढविण्याबाबत**

**(१६) २८९५५ (१४-०१-२०१६). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्हयात रोजगार हमी योजने अंतर्गत केवळ ९७ कामे सुरु असून त्यावर फक्त ६०९ मजूर काम करीत असून सोलापूर जिल्हयाचा आवाका व दुष्काळ सदृश्य परिस्थिती लक्षात घेता ही संख्या अतिशय कमी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोलापूर जिल्हयातील दुष्काळ सदृश्य परिस्थिती पाहता रोजगार हमी योजने अंतर्गत कामे वाढवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०३-२०१६) :**(१) सोलापूर जिल्हयामध्ये मग्रारोहयो अंतर्गत दि. १७ सप्टेंबर, २०१५ ते २३ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत सरासरी कमे ९७ व त्यावर ६०९ मजूर काम करीत होते.

जिल्हयामध्ये माहे डिसेंबर, २०१५ व जानेवारी, २०१६ मध्ये ६०९९ मजूरांनी कामाची मागणी केलेली आहे. त्यापैकी ६०९९ मजूराना कामे पुरविण्यात आलेली आहेत.

(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतेर्गत सोलापूर जिल्ह्यातील ७०५८३ ॲक्टीव्ही मजूर आहेत. त्यापैकी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात १४३९४ मजूरांनी नमुना क्र. ४ फॉर्म भरुन कामाची मागणी केली होती. त्यापैकी सर्व १४३९४ मजूरांना काम उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

सर्व ग्रामपंचायतीकडे नवीन मजूरांच्या नोंदणीसाठी नमुना क्र.१ व नमुना क्र. ३ (जॉबकार्ड), काम मागणीसाठी नमुना क्र. ४ हे पुरेशा प्रमाण उपलब्ध करण्यात आलेले आहेत. सन २०१६-१७ च्या आर्थिक वर्षासाठीच्या लेबर बजेट मध्ये जलसंधारण व कृषीविषयक ६० टक्के कामे घेण्यात आलेली आहेत.

सन २०१६-१७ चे लेबर बजेट तयार करताना प्रशिक्षीत BPT पथकांमार्फत सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट माढा, मंगळवेढा व दक्षित सोलापूर या तालुक्यामध्ये वंचित घटकातील कुटूंबाना उपजीवीकेचे साधन उपलब्ध करुन देण्यासठी तसेच त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सर्वकष सहभागी नियोजन प्रक्रियेमार्फत (IPPF-२) ३८६ ग्रामपंचायतील ८६३०६ लोकांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे.

सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात सोलापूर जिल्ह्यात ४९१८ इतक्या ग्रामरोजगार दिवसाचे आयोजन करण्यात आले आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत EFMS मार्फत होणाऱ्या मजूरांच्या मजूरीसाठी सोलापूर जिल्ह्यात ५३३१२ मजूरांचे बँकेत खाते उघडण्यात आलेले आहे. १००२०१ मजूरांचे पोष्टात खाते उघडण्यात आलेले आहे. १४२०० मजूरांचे को.ऑपरेटिव्ह बँकेत खाते उघण्यात आलेले आहे.

मग्रारोहयो अंतर्गत कामे व मजूर उपस्थिती वाढविण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर दवंडी देण्यात येत आहे, सरपंच, ग्रामसेवक व तलाठी यांच्या सभा कार्यशाळा घेण्यात येत आहेत. तसेच मोबाईल व्हॅनदवारे जनजागृती करण्यात आलेली आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सद्य:स्थितीमध्ये शेल्फवरील कामे १४१५९ इतकी असून मजूर क्षमता ८५.०५ लक्ष इतकी आहे. कामाची मागणी प्राप्त होताच त्वरीत कामे देण्याची तजवीज आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## समन्यायी पाणी वाटप कायद्यातील तरतुदीनुसार जायकवाडी धरणात पाणी सोडण्याबाबत

**(१७) २८९६८ (२०-०१-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समन्यायी पाणी वाटप कायद्यातील तरतुदीनुसार जायकवाडी धरणाच्या वरील भागातील गोदावरी, मुळा व प्रवरा नद्यांवरील प्रकल्पातुन पाणी सोडण्याचा निर्णय गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास मंडळाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने अमंलबजावणीची सद्य स्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०३-२०१६) :**(१) होय.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या दि.१९/९/२०१४ च्या निवाड्यानुसार गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने गोदावरी खोऱ्यांतर्गत जलाशयांमध्ये समन्यायी पाणी वाटप करण्यासाठी जायकवाडीच्या उर्ध्व भागातील धरण समुहातून जायकवाडीच्या नाथसागर जलाशयात १२.८४ टी.एम.सी. पाणी सोडण्याचे आदेश दि.१७/१०/२०१५ अन्वये दिले आहेत.

(२) दि.१७/१०/२०१५६ च्या आदेशानुसार दि.२८/११/२०१५ पर्यंत उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील धरण समुहातून एकूण १०.४० टी.एम.सी. पाणी सोडण्यात आलेले आहे. उर्वरीत २.४४ टी.एम.सी. पाणी सोडण्याची कार्यवाही या प्रकरणी मा.उच्च न्यायालयात प्रगत असलेल्या सुनावणीतील आदेशांच्या अधिन राहून करावयाची आहे. सद्य:स्थितीत दि.२९/११/२०१५ पासून पाणी सोडण्याची कार्यवाही पुर्णपणे बंद आहे. जायकवाडी जलाशयात सोडण्यात आलेल्या १०.४० टी.एम.सी. पाण्यापैकी वहनव्यय वजा जाता जायकवाडी जलाशयात ६.६३ टी.एम.सी. पाणी प्राप्त झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील विविध विभागांचा निधी विनावापर पडून असल्याबाबत**

**(१८) २९०५२ (१४-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील विविध विभागांचा ४७ कोटींचा निधी अखर्चित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधीपैकी ३४ कोटी १३ लाख रुपये शासनास परत करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध विभागांचा विकास अखर्चित निधीमुळे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विविध विभागांच्या अयोग्य कारभारामुळे निधी परत करावा लागला याबाबत संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे.

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडे सन २०१४-१५ अखेर अखर्चित निधी रु.५१.९३ कोटी इतका होता त्यापैकी रु.२९.८५ कोटी वेतनाचा निधी व रु.२२.०७ कोटी योजनेचा निधी (वेतनेतर) अखर्चित होता.

(२) हे खरे आहे.

कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील एकुण रु.५१.९३ कोटी इतक्या अखर्चित निधीपैकी रु.३९.७६ कोटी इतका निधी शासन खाती भरणा करण्यात आला आहे. त्यामध्ये रु.२८.८१ कोटी वेतनावरील अखर्चित निधी असून रु.१०.९५ कोटी इतका योजनांचा अखर्चित निधी शासन खाती भरणा करण्यात आला आहे.

(३) कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील योजनांचा अखर्चित निधी शासन खाती भरणा केल्यामुळे जिल्हा परिषद कोल्हापूरकडील कोणत्याही विभागांचा विकास रखडला गेलेला नाही.
(४) कोल्हापूर जिल्हा परिषदेकडील निधी अखर्चित राहिल्याबद्दल तत्कालीन कार्यकारी अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटर्सना मानधन मिळाले नसल्याबाबत**

**(१९) २९४४४ (२२-०१-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यात ग्रामपंचायतीमध्ये कार्यरत असलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटर्सना माहे जून, २०१५ पासून मानधन मिळाले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने या कर्मचा-यांचे मानधन त्वरीत अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०५-२०१६) :**(१) अंशत: खरे
ग्रामपंचायत संगणक परिचालकांना माहे सप्टेंबर, २०१५ पर्यंतचा मोबदला अदा करण्यात आलेला आहे.
(२) व (३) संग्राम प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वित असलेले तांत्रिक मनुष्यबळ महाऑनलाईन कंपनीने उपलब्ध करुन दिलेले होते. यांचा मोबदला अदा करण्याची वैधानिक जाबाबदारी महाऑनलाईन कंपनीची असल्याने उर्वरित कालावधीतचा मोबदला त्वरीत अदा करण्याबाबत शासन स्तरावरुन सर्व संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत.

---

**कोपरगाव व श्रीरामपूर (जि.अहमदनगर) येथील मजुरांच्या मागणीवर रोजगार हमी योजनेतंर्गत कामे सुरु करण्याबाबत**

**(२०) २९५६० (२२-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्ह्यात अनेक ठिकाणी रोजगार हमी योजनाच्या कामाची मागणी असतानाही कामे सुरु केली जात नाहीत काही ठिकाणी ग्रामपंचायतीच्या कामात गैरप्रकार होत आहे तसेच कोपरगाव व श्रीरामपूर तालुक्यात एकही काम सुरु नसल्याने माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील मजुरांच्या मागणीवर रोजगार हमी योजनेतंर्गत कामे सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही. ज्या ग्रामपंचायतीकडून मंजूरांची मागणी होते तिथे मजूर पाठवून त्यांना काम उपलबध करुन दिले जाते. ऑगस्ट, २०१५ मध्ये अहमदनगर जिल्हयातील रोजगार हमी योजनेची एकूण ४२५ कामे सुरु होती व त्या कामांवर २९७८ मजूर काम करीत होते. अहमदनगर जिल्हयातील कोपरगाव तालुक्यात १३ कामे व श्रीरामपूर तालुक्यात ११ कामे ऑगस्ट, २०१५ मध्ये सुरू होती.

अहमदनगर जिल्हा परिषदेला ग्रामपंचायतीच्या कामात गैरप्रकार झाल्याची एकही तक्रार ऑगस्ट, २०१५ मध्ये प्राप्त झालेली नाही.
(२) लागू नाही. परंतु ग्रामीण भागात एकंदर किती मजूरांना कामाची आवश्यकता आहे याची पहाणी करण्याकरिता कामाची आवश्यकता आहे अशा मजुरांकडून नमुना क्र. ४ चा फॉर्म भरुन घेण्यात आला व त्यामध्ये एकूण ९१७४ मजूरांनी कामाची मागणी नोंदविली. त्यानुसार आतापर्यंत ६३०३ मजुरांना काम उपलब्ध करुन दिलेले आहे.

उर्वरित ३५६८ मजूरांना फेब्रुवारी व मार्च महिन्यामध्ये काम उपलबध करुन दिले जाणार आहे. सदर मजूरांना काम उपलब्ध करुन देण्यासाठी कामांचा सेल्फ तयार करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्हयात दारिद्र रेषा सर्व्हेक्षण सदोष असल्याबाबत**

**(२१) २९६७१ (२२-०१-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्हयात दारिद्र रेषा सर्व्हेत प्रगणकांनी मनमानीपणे सर्व्हेक्षण करुन हजारो खऱ्याखु-या लाभार्थींना दारिद्र रेषा सर्व्हेत वगळून ज्यांच्याकडे ओलितांची शेती, सिमेंटची पक्की घरे, ट्रॅक्टरसारखी वाहने आहेत अशा धनाढ्यांचा समावेश केल्याच्या तक्रारी अनेक गावातील ख-या लाभार्थीमधून होत असल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रशासनाची शासनास माहिती आहे काय,
(३) असल्यास, महसूल प्रशासनाने याची तातडनीने दखल घेऊन संबंधितांवर कारवाई करुन खऱ्या लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०५-२०१६) :**(१) नाही.

तथापि या यादीमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबतच्या तक्रारी प्राप्त होत आहे.

(२) व (३) बुलढाणा जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंब गणना २००२ ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेंनुसार करण्यात आलेली आहे.

या यादीमध्ये ज्या व्यक्तींचा समावेश झालेला नाही त्या व्यक्तीकरिता अपिलाची तरतूद (प्रथम अपिल तहसिलदार/उपजिल्हाधिकारी व व्दितीय अपिल जिल्हाधिकारी) करण्यात आलेली असून या अपिलामध्ये पात्र ठरलेल्या कुटुंबांचा समावेश दारिद्रय रेषेखालील यादीमध्ये करण्याची कार्यवाही शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक:दारेग २०१०/प्र.क्र.४२७/यो-१, दिनांक २७ ऑगस्ट, २०१० अन्वये सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाथर्डी (जि.अहमदनगर) तालुक्यातील मढी येथील कानिफनाथ देवस्थानात भाविकांसाठी असलेल्या शौचालयांचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(२२) २९९२९ (१६-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथर्डी (जि.अहमदनगर) तालुक्यातील मढी येथील कानिफनाथ देवस्थानात भाविकांच्या सोयीसाठी ३८ शौचालयांचे बांधकाम करण्यात आले आहे परंतु हे काम निकृष्ट झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे शासनाने चौकशी करुन संबंधित ठेकेदाराला काळया यादीत टाकण्याबाबत बांधकाम विभागाच्या दक्षिण विभागातील अभियंत्यावर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०५-२०१६) :**(१) होय.

(२) शौचालयाचे बांधकाम निकृष्ट केल्याबाबत संबंधित ठेकेदारास नोटीस देण्यात आली असून, सदर ठेकेदाराचे नांव काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करणेबाबत कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग, अहमदनगर यांच्या मार्फत कारवाई करण्यात येत आहे. सदर कामाशी संबंधित कनिष्ठ अभियंता, श्री.एस.एन.आंबेडकर, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पाथर्डी यांना दोन वार्षिक वेतनवाढ पुढील भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशा रितीने बंद करण्याची शिक्षा देण्यात आलेली आहे. तसेच श्री.काकडे, बी.डी.शाखा अभियंता तथा तत्कालीन उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग ता.पाथर्डी यांना एक वार्षिक वेतनवाढ पुढील भविष्यकालीन वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशा रितीने बंद करण्याची शिक्षा देण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोरेगांव (जि.सातारा) तालुक्यातील सातारारोड-भक्तवडी रस्त्यावर धोम डाव्या कालव्यावर बांधण्यात आलेला पुलाचा बिम कोसळल्याबाबत**

**(२३) ३०४१५ (२२-१२-२०१५). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगांव (जि.सातारा) तालुक्यातील सातारारोड-भक्तवडी रस्त्यावर धोम डाव्या कालव्यावर बांधण्यात आलेला पुलाचा बिम दि. १३ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास कोसळला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे हा पूल कोणत्याही क्षणी कोसळण्याची शक्यता निर्माण होऊन वाहतुकीसाठी धोकादायक बनाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने या पूलाची पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०४-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

सदरील ठिकाणचे बांधकाम हे वाहतूकीचा पूल नसून ओढयाचे पाणी कालव्यावरुन वाहून जाण्यासाठी अधिजल मार्ग (Super passage) म्हणू बांधण्यात आले आहे. या बांधकामावरुन वाहतूक अपेक्षित नाही. तथापि सदर बांधकाम होऊन बरीच वर्षे झाल्यामुळे व स्थानिक लोकांकडून या बांधकामाचा वापर पुलासारखा वाहतूकीसाठी करण्यात येत असल्यामुळे या बांधकामाच्या दगडी पीयरचा काही भाग कोसळला होता.

(३) होय.

(४) या कोसळलेल्या दगडी बांधकामाची दुरुस्ती सलोह संधानकामध्ये करण्यात आली आहे व सद्य:स्थितीत या बांधकामास कोणताही धोका नाही. तसेच या बांधकामाच्या नजीकच वाहतूकीसाठी गाव रस्तापुल उपलब्ध असल्यामुळे या बांधकामावरुन वाहतूक करु नये असा फलक बांधकाम स्थळी लावण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भाटघर व नीरा देवघर (ता.भोर जि.पुणे) या दोन्ही धरणात पाणीसाठा कमी झाल्यामुळे पाणीसाठ्याचे नियोजन करण्याबाबत**

**(२४) ३११०३ (२२-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाटघर व नीरा देवघर (ता.भोर,जि.पुणे) या दोन्ही धरणात मागच्या वर्षीच्या तुलनेत ३० टक्के व वीर धरणात ८६ टक्के पाणी साठा कमी असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणाचे उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०३-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
निरा खोऱ्यातील भाटघर धरणामध्ये ३० सप्टेंबर, २०१५ रोजी ४६४.५९ द.ल.घ.मी म्हणजेच ६८.७४% तर नीरा देवघर धरणामध्ये २२२.२६ द.ल.घ.मी म्हणजेच ६५.३४% पाणीसाठा होता. म्हणजेच भाटघर धरणामध्ये सप्टेंबर, २०१५ अखेरीस ३१.२६% कमी व नीरा देवघर धरणामध्ये ३४.६६% कमी पाणीसाठा होता तसेच वीर धरणामध्ये सप्टेंबर, २०१५ अखेरीस १४९.९४ द.ल.घ.मी. म्हणजेच ५१.७४% पाणीसाठा होता. म्हणजेच वीर धरणामध्ये ४८.२६% कमी पाणीसाठा होता.
(२) नीरा खेऱ्यातील वरील तीनही धरणांमध्ये दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी असलेल्या उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन कालवा समितीच्या बैठकीत करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नडगांव (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीमध्ये घरपट्टीत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२५) ३१४१३ (२२-०१-२०१६). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नडगांव (ता.कल्याण, जि.ठाणे) ग्रामपंचायतीमध्ये घरपट्टीत गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्याने स्थानिक नागरिकांनी गटविकास अधिकारी, मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडे तक्रारी अर्ज केल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीअंती काय आढळून आले,
(३) असल्यास, ग्रामपंचायतीच्या घरपट्टीमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या ग्रामसेवक, सरपंच व ग्रामपंचायत कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०५-२०१६) :**(१) होय.
(२) व (३) होय. याप्रकरणी चौकशी करण्यात आली असता, चौकशी अहवालानुसार ग्रामपंचायत कर्मचारी श्री.रशेम भोईर यांनी खोटी बीले बजावल्याने दिसून आले. त्यांनी ग्रामपंचायत कारभारात अनियमितता केल्या कारणाने त्यांना निलंबित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे मोकली-काऱ्हाळ (ता.बिलोली, जि.नांदेड) गट ग्राम पंचायतीचे विभाजन करुन काऱ्हाळ या महसूली गावास स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबत**

**(२६) ३२२४४ (२२-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.मोकली-का-हाळ (ता.बिलोली जि.नांदेड) गट ग्राम पंचायतीचे विभाजन करुन काऱ्हाळ या महसूली गावास स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, उक्त गट ग्रामपंचायतीचे विभाजन करुन काऱ्हाळ या महसूली गावास स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने काय निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१६) :**(१) नाही.

(२) होय.

(३) दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ च्या शासन निर्णयानुसार ज्या गावी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करावयाची आहे. त्या गावाची लोकसंख्या २००० असणे आवश्यक आहे. आदिवासी किंवा तांडा या भागांसाठी तसेच, दोन गावांत तीन कि.मी. पेक्षा अधिक अंतर असल्यास अशा गावाची लोकसंख्या १००० असणे आवश्यक आहे. तसेच सदरील शासन निर्णयानुसार ग्रामपंचायतीची निवडणमक होवून दोन वर्षाच्या कालावधीपर्यंत ग्रामपंचायतीची विभाजन/एकत्रिकरण एकत्रिकरण करता येत नाही. सन २०११ च्या जनगणनेनुसार काऱ्हाळ या महसूली गावाची लोकसंख्या ३८५ इतकी असून मौ.मोकली-काऱ्हाळ या गट ग्रामपंचायतीची निवडणूक सप्टेंबर, २०१५ मध्ये झाली आहे. शासन निर्णयातील निकषांची पूर्तता होत नसल्यामुळे मौ.मोकली-काऱ्हाळ या गट ग्रामपंचायतीचे विभाजन करुन काऱ्हाळ या महसुली गावी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करता येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**देगलूर व बिलोली (जि.नांदेड) येथील रस्त्यावरील पुलाच्या कामास निधी मिळण्याबाबत**

**(२७) ३२२४९ (१६-०१-२०१६). श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर व बिलोली (जि.नांदेड) येथील प्रजिमा-५४ हनुमान-हिपरगा-नरंगल-सावरगाव (थडी) उमर सांगवी या रस्त्यावरील पुलाच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी, ग्रामविकास व जलसंधारण मंत्री तसेच सह सचिव, ग्रामविकास विभाग यांना माहे सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच उपरोक्त पुलाचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याच्यादृष्टीने अधिक्षक अभियंता, प्रधानमंत्री, ग्रामसडक योजना, औरंगाबाद यांनी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत सह सचिव, ग्रामविकास विभाग, यांच्याकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पुलाच्या कामास निधी उपलब्ध करुन देण्यास विलंबाची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, निधी त्वरित उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०५-२०१६) :**(१) व (२) माहे जुलै २०१५ मध्ये प्रश्नांकीत विषयाच्या अनुषंगाने स्थानिक लोकप्रतिनिधीकडून पत्रव्यवहार प्राप्त झालेला आहे.

केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीच्या प्रमाणात तसेच संबंधित कामाच्या प्रगतीनुसार निधीचे वितरीत करण्यात येते. त्यानुसार अधीक्षक अभियंता, औरंगाबाद विभाग यांनी केलेल्या निधीच्या मागणीच्या अनुषंगाने प्रश्नांकीत पुलाच्या कामास आतापर्यंत रु.५६२.४३ लक्ष इतका निधी वितरीत केलेला असून सदर निधी खर्च करण्यात आलेला आहे.

(३) व (४) राज्याला आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यासाठी वेळोवेळी केंद्र शासनास राज्य शासन स्तरावरुन पाठपूरावा करण्यात आलेला आहे. केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांसोबतच्या प्रादेशिक आढावा बैठकांमध्येही राज्यास पूरेसा निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आलेली आहे. राज्याची निधीची मागणी मांडण्याकरीता मा.मंत्री (ग्रामविकास) महोदया व मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांनी दि.१ जून, २०१५ रोजी मा.केंद्रीय वित्त मंत्री व केंद्रीय ग्रामविकास मंत्री यांची नवी दिल्ली येथे भेट घेतली आहे. तसेच पत्राद्वारे पाठपुरावा करण्यात येत असून मा.मुख्यमंत्री यांनी त्यांच्या दि.१ ऑगस्ट, २०१५ च्या पत्रान्वये मा.प्रधानमंत्री व मा.केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री यांना निधी वितरीत करणेबाबत विनंती केली आहे.

---

## अचलपूर मतदारसंघातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग करिता डी.पी.डी.सी. अंतर्गत अतिरिक्त निधी मिळण्याबाबत

**(२८) ३२५८२ (२०-०१-२०१६). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर मतदारसंघातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग करिता डी.पी.डी.सी अंतर्गत माहे जुलै, २०१५ च्या अर्थसंकल्पात ३ कोटीचा अतिरिक्त निधी मिळण्याबाबत स्थानिक विधानसभा सदस्य अचलपूर यांनी शासनास दिनांक १६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्या सुमारास पत्र लिहून मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०२-२०१६) :**(१) व (२) अचलपूर मतदार संघातील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्गाची दुरुस्तीसाठी जुलै, २०१५ च्या अर्थसंकल्पामध्ये रस्त्याच्या कामासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याबाबत श्री.ओमप्रकाश उर्फ बच्चू बा.कडू, विधानसभा सदस्य यांचे दि. १५/०६/२०१५ चे पत्र प्राप्त झाले आहे.

जिल्हा वार्षिक योजनेच्या निधी वाटपाचे सुत्र शासन निर्णय नियोजन विभाग दि. १७/०४/२०१० अन्वये निश्चित करण्यात आले आहे. सदर निधी वाटप सुत्रानुसार अमरावती जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) साठी सन २०१५-१६ करीता रु. २१७.९२ कोटी निधी जिल्हा वार्षिक योजना राज्यस्तर बैठकीत निश्चित करण्यात आला. संपूर्ण निधी अर्थसंकल्पिय करण्यात येवून जिल्ह्यास उपलब्ध करुन देण्यात आला असल्याने अतिरिक्त निधी मंजूर करता येणार नाही. तथापि जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत एखाद्या योजनेस मागणीनुसार पुनर्विनियोजनाने निधी उपलब्ध करण्याचे अधिकारी संबंधित जिल्हा नियोजन समितीस आहेत. त्यामुळे उपरोक्त पत्रान्वये केलेल्या मागणीस अनुसरुन जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने उचित कार्यवाही करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, अमरावती यांना शासन पत्र दि. १५/०७/२०१५ अन्वये सुचित करण्यात आले आहे व यानुषंगाने दि. ३०/०८/२०१५ च्या पत्रान्वये ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, विधानसभा सदस्य यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्ह्यात अपंगांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या सुमारे २०० प्रस्तावांना मंजुरी देण्याबाबत**

**(२९) ३३०४३ (१४-०१-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात अपंगांना रोजगार उपलब्ध करुन देण्याच्या सुमारे २०० प्रस्तावांना अद्याप मंजुरी दिली नसल्याने सन २०११-२०१२ ते २०१३-२०१४ या कालावधीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्रस्तावास मंजुरी देऊन सदर प्रस्ताव निकाली काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही. तथापि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कार्यक्रमांतर्गत अहदनगर जिल्ह्यात अपंगांना MIS वरील उपलब्ध माहितीनुसार कामाची मागणी केल्यानंतर सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षात खालीलप्रमाणे रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | वर्ष | अपंग व्यक्तींना रोजगार दिल्याची संख्या | मनुष्यदिन निर्मिती |
|---|---|---|---|
| १. | २०१२-१३ | ३०३ | ७९८४ |
| २. | २०१३-१४ | १०९ | ३४६३ |
| | एकूण | ४१२ | ११४४७ |

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) या तालुक्यातील गिरणा धरणातील पाणी साठा शिल्लक ठेवण्याबाबत**

**(३०) ३३१४९ (१५-०१-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) या तालुक्यातील गिरणा धरणातील पाणी साठा शिल्लक ठेवण्यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, नाशिक यांना दिनांक ०४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१२-०४-२०१६) :**(१) होय.

(२) मा.पालकमंत्री जळगांव जिल्हा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय पाणी आरक्षण समितीने गिरणा धरणातून मालेगाव शहरासाठी ४.२५ दलघमी पाणी आरक्षणास मान्यता दिली आहे. तसेच मा.पालकमंत्री, नाशिक जिल्हा यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय पाणी आरक्षण समितीने मालेगांव शहरातील चणकापूर जलाशयातून सन २०१५-१६ साठी ४९.३३ दलघमी (१७.४२ दलघफू) पाणी आरक्षित केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दर्यापूर मतदारसंघातील शेंडगावचा विकास आराखडा मंजूर करण्याबाबत**

**(३१) ३३७३८ (२२-०१-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर मतदारसंघातील शेंडगाव अजूनही विकासापासून वंचित असून शेंडगाव विकास आराखडा शासनाकडे अजुनही प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, शेंडगावाचा विकास आराखडा कधी मंजूर होणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

शेंडगांव या गावाच्या विकासाकरीता मा.लोकप्रतिनिधी यांनी विविध कामे प्रस्तावित केलेली आहेत. सदर कामे शासनाच्या विविध विभागाशी संबंधित आहेत.

(२) प्रस्तावित कामांपैकी काही कामे ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेशी संबंधित आहेत. परंतु सदर तीर्थक्षेत्रास प्रथम "ब" वर्ग दर्जा देणे आवश्यक असल्याने, सदर तीर्थक्षेत्रास "ब" वर्ग दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत जिल्हा परिषद, अमरावती यांना कळविण्यात आले आहे. तसेच इतर कामे अन्य विभागाशी संबंधित असल्याने, सदर कामे संबंधित विभागांच्या योजनेतून प्रस्तावित करुन तसा प्रस्ताव शासनाच्या अथवा जिल्हा परिषदेच्या संबंधित विभागाकडे सादर करण्याबाबत जिल्हा परिषदेस कळविण्यात आले आहे.

(३) जिल्हा परिषदेकडून सदर तीर्थक्षेत्रास "ब" वर्ग दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, सदर तीर्थक्षेत्रास "ब" वर्ग व निधी देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य निकष समितीच्या विचारार्थ सादर करण्यात येईल.

---

## लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील दलित वस्तीमध्ये लावण्यात आलेले सौर उर्जेचे पथदिवे निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(३२) ३३९७७ (१६-०१-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यात बीआरजीएफ अंतर्गत सन २०११-१२ अंतर्गत ५ गांवे डेरला, नगारवाडी, पोलिसवाडे, सावरगांव (न) झरी या गावात दलित वस्तीसाठी सौर उर्जेचे पथदिवे लावण्यात आले परंतू ब-याच विभागात हे सौरदिवे निकृष्ट दर्जाचे असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी झालेल्या गैरव्यवहाराबाबत ज्ञात होण्याकरिता माहिती अधिकारात श्री.गजानन मोरे यांनी माहिती मागितली असता त्यांना प्रशासकीय आदेशाची प्रत देण्यात आली व विचारलेली माहिती ग्रामसेवकाकडून घ्यावी असे सांगण्यात आले तरी याबाबत आवश्यक माहिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३१-०३-२०१६) :**(१) होय.

(२) श्री.गजानन मोरे यांनी माहिती अधिकार अंतर्गत मागितलेल्या माहिती पैकी जी माहिती पंचायत समितीस्तरावर उपलब्ध होती ती अर्जदारास उपलब्ध करुन देवून उर्वरित माहिती ग्रामपंचायत स्तरावर असल्यामुळे गट विकास अधिकारी, पंचायत समिती, लोहा यांनी त्यांचे

पत्र क्र.१६७६/२०१५ दिनांक २९.०७.२०१५ अन्वये संबंधित ग्रामसेवकास पत्र देवून अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर माहिती दिनांक १६.०३.२०१६ चे पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कडगाव (ता.भुदरगड) येथील नूतन ग्रामपंचायत**
**इमारत बांधकामामध्ये झालेला गैरव्यवहार**

**(३३) ३४४३४ (१४-०१-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कडगाव (ता.भुदरगड) येथील नूतन ग्रामपंचायत इमारत बांधकामामध्ये गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑक्टोंबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्यात यावी याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी कोल्हापूर यांचेकडे वारंवार गावकरी यांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रामपंचायत इमारत मधील दुकान गाळे चुकीच्या पद्धतीने करारबद्ध करून वितरीत केलेले गाळे ताब्यात घेऊन दोषी ग्रामपंचायत सरपंच, सदस्य व ग्रामसेवक यांच्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
दिनांक २१.०५.२०१५ रोजी अर्ज प्राप्त झालेला होता, त्यानुसार चौकशी करुन, चौकशी अंती ग्रामपंचायत सचिवालय गाळे भाडे करार करणे बाबत ग्रामपंचायत कडगांव कडील तत्कालीन कार्यकारीणीने अनियमितता केलेली प्रथम दर्शनी दिसून आले आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आलेली असून, याबाबत ग्रामपंचायती कडील तत्कालीन सरपंच व सदस्य हे दोषी असल्याचे निदर्शनास आले असल्याने त्यांचेवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम मधील कलम १७८ अन्वये कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विद्यमान सरपंच व सदस्य यांचेवर सदर प्रकरणी विलंब करणे, दुर्लक्ष करणे, टाळाटाळ करणे यास्तव महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम मधील कलम ३९ प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच तत्कालीन ग्रामसेवक हे ही दोषी असल्याने व ते दिनांक १५.१२.२००४ रोजी सेवा निवृत्त झाले असून त्याचेकडून रक्कम रु. २२,३१८/- वसुल करण्याची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दुधगंगा (ता.राधानगरी) धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्याला अंतर्गत अस्थरीकरण नसल्यामुळे जमीन नापीक होत असल्याबाबत**

**(३४) ३४४३९ (२०-०१-२०१६). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुधगंगा (ता.राधानगरी) धरणाच्या डाव्या व उजव्या कालव्याला अंतर्गत अस्थरीकरण नसल्यामुळे हजारो एकर जमीन पाणी निचऱ्यामुळे नापीक होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डाव्या कालव्यामध्ये ऐनी आटेगाव ते मुधाळ तिट्टा व उजव्या कालव्याच्या लिंगाचीवाडी ते शेळेवाडी पर्यंत अंतर्गत अस्थरीकरणाची मागणी स्थानिक नागरिकांकडून पाटबंधारे विभागाकडे वारंवार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत उपाययोजना म्हणून जिओ सिंथेटीक/प्लास्टरिंग करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०४-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) होय.

(३) दुधगंगा प्रकल्पास सन २०१५-१६ साठी रु.१८.०० कोटी इतका निधी उपलबध असून सन २०१५-१६ मध्ये प्रकल्पीय कामावर रु.१५.४० कोटी इतका खर्च झालेला आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार जिओ सिंथेटिक/प्लास्टरींगची कामे हाती घेण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घोड धरणात तुकडी धरणामधून व नदीवरील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांमधून पाणी पुरवठा करण्याबाबत**

**(३५) ३४४५४ (२२-०१-२०१६). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोड धरणात तुकडी धरणामधून व नदीवरील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्यांमधून पाणी सोडण्याबाबत लेखी निवेदन सादर करावे असे आदेश महाराष्ट्र जलसंपत्ती प्राधिकरणाने दिनांक १ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाला दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदन जलसंपत्ती प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०३-०५-२०१६) :**(१) व (२) घोड धरणात कुकडी प्रकलपातून पाणी सोडण्याबाबत दोन्ही प्रकल्पाबाबतची माहिती सादर करण्याबाबतचे आदेश महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी दि.०१.१०.२०१५ रोजी अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र

विकास प्राधिकरण, पुणे यांना दिले होते. त्यानुसार त्याबाबतची माहिती संबंधितांनी दि.०८.१०.२०१५ रोजी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणास देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील दिवे बसविण्याच्या प्रकरणात झालेला गैरव्यवहार**

**(३६) ३४७०५ (१४-०१-२०१६). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहा (जि.नांदेड) तालुक्यातील सन २०११-१२ ते २०१४-१५ या वर्षात सर्वसाधारण व अनुसूचित जाती उपयोजने अंतर्गत ८७ गावात १,०१,९४,०००/- एवढ्या निधी खर्च करुन ५५३ दिवे बसविले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी खर्च करुनही सदर गावामध्ये अद्यापही अंधारच असून बसविण्यात आलेल्या दिव्याच्या काहीच उपयोग झाला नसून या प्रकरणात गैरव्यवहार झाल्याचे दिनांक १५ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हेखरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१६) :**(१) नाही.
लोहा (जि.नांदेड) तालुकयात सन २०११-१२ ते २०१४-१५ वर्षातील या अंतर्गत ८४ ग्रामपंचायतीमध्ये रु.६६.०५.६४८/- इतका निधी खर्च करुन ४६५ सौर पथदिवे बसविण्यात आले आहेत.
(२) सौरपथ दिव्यांसाठी पुरवठादाराची निवड प्रक्रिया ग्रामपंचायत स्तरावर झाली आहे. संबंधित पुरवठादारास पुरवठा आदेश देऊन ही कामे ग्रामपंचायतीने पुर्ण करुन घेतली आहेत. ग्रामपंचायत व पुरवठादार यांनी पाच वर्षाच्या देखभाल दुरुस्तीबाबतचा करार केला आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(३) सौर पथदिवे बसविण्यात आलेल्या ग्रामपंचायतीची गट विकास अधिकारी यांनी विस्तार अधिकारी यांचेमार्फत चौकशी केली असून सौर पथदिवे यांची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी संबंधित ग्रामपंचायतीस व पुरवठादारास कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत**

**(३७) ३४८६७ (१४-०१-२०१६). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय कर्मचारी संघटनेनी दिनांक १७ ऑक्टोबर, २०१५ रोजी आपल्या मागण्यांसाठी राज्यभर आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय कर्मचाऱ्यांच्या थकित महागाई भत्ता तातडीने देण्यात यावा, दिवाळीचा बोनस व अग्रीम दिवाळीपूर्वी रोखीने मिळावा तसेच अनुकंपा वारसा हक्क समितीची बैठक तातडीने घ्यावी या मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०४-२०१६) :**(१) व (२) सदर दिनांकास शासकीय कर्मचारी संघटनांनी त्यांच्या कोणत्याही मागणीबाबत कोणतेही निवेदन सादर केलेले नाही वा नोटीस दिलेली नाही. अथवा आंदोलन केल्याचा अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.
(३) तथापि, दि.१५/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याच्या दरामध्ये दि.१/१/२०१५ पासून १०७% वरुन ११३% वाढ करण्यात आलेली आहे. तर दि.५/२/२०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याच्या दरामध्ये दि.१/७/२०१५ पासून ११३% वरुन ११९% वाढ करण्यात आलेली आहे.
अग्रीम दिवाळीपुर्वी रोखीने मिळावा अशी कोणतीही मागणी प्राप्त झालेली नाही.
शासकीय/अधिकारी यांना बोनस न देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.
राज्यातील राज्य शासकीय /निमशासकीय/महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी अनुकंपा धोरण सुधारण्याबाबत मा.वित्त मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली असून सदर उपसमितीच्या अद्यापपर्यंत तीन बैठका झालेल्या आहेत. सदर समितीने अद्याप अहवाल सादर केलेला नाही.
(४) या प्रकरणी विलंब झालेला नाही.

---

**गडचांदूर (जि.चंद्रपूर) नजिकच्या ग्रामपंचायत नांदा येथे आदिवासी क्षेत्र उपाययोजनेतंर्गत प्राप्त झालेल्या निधीत झालेला गैरव्यवहार**

**(३८) ३५०६४ (२०-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचांदूर (जि.चंद्रपूर) नजिकच्या ग्रामपंचायत नांदा येथे आदिवासी क्षेत्र उपाययोजनेअंतर्गत सन २०१०-११ व २०११-१२ या वित्तीय वर्षात प्राप्त झालेल्या सुमारे १७ लक्ष निधीपैकी ७ लाख ३७ हजार ६६५ रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येऊन तीन वर्षाचा कालावधी उलटूनही अद्यापही दोषी सरपंच पूजा ज्ञानेश्वर मडावी व तत्कालिन ग्रामसेवक यांचेवर कोणतीच कारवाई केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अद्यापपर्यंत कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०५-२०१६) :**(१) नाही.

(२) व (३) उपायुक्त (पुनर्वसन), नागपूर विभाग, नागपूर यांनी पत्र क्रमांक विशा/डे/११ (२) कावि/७८८/२०१५, दिनांक ११.१२.२०१५ नुसार दिनांक १०.१२.२०१५ रोजी आदेश पारित करुन श्रीमती पुजा ज्ञानेश्वर मडावी यांना ग्रामपंचायत नांदा, ता.कोरपना, जि.चंद्रपूरचे सरपंच तथा सदस्य पदावर राहण्यास महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९ (१) अन्वये अपात्र ठरविण्यात आल्यामुळे संबंधित सरपंच यांना सरपंच तथा सदस्य पदावरुन दूर करण्यात आले होते. परंतु संबंधित सरपंच यांनी उपायुक्त (पुनर्वसन), नागपूर विभाग, नागपूर यांच्या दिनांक १०.१२.२०१५ च्या आदेशाविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ कलम ३९(३) नुसार मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांच्या न्यायालयामध्ये अपिल दाखल केल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी उपायुक्त (पुनर्वसन), नागपूर विभाग, नागपूर यांच्या दिनांक १०.१२.२०१५ रोजीच्या आदेशाला स्थगिती आदेश देण्यात आले आहेत. प्रस्तुत अर्धन्यायिक प्रकरणी मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांच्या न्यायालयामध्ये कार्यवाही सुरु आहे. तसेच प्रकरणात तत्कालीन सचिव यांचेवर कार्यवाही करण्यासंबंधाने चौकशी अधिकारी यांची नियुक्त करण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली असून चौकशी अधिकारी यांचा अहवाल प्रापत होताच नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

## नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या धर्तीवर नृसिंहवाडीतील दत्त तीर्थक्षेत्राच्या विकास कामाच्या अहवालाबाबत

**(३९) ३५१५६ (२२-०१-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळयाच्या धर्तीवर नृसिंहवाडीतील दत्त तीर्थक्षेत्राला सन २०१६ च्या कन्यागत महापर्वकाळाच्या पाश्र्वभूमीवर विकास कामासाठी निधी कमी पडून देणार नाही, याबाबतचा अहवाल आठ दिवसांच्या आत जिल्हाधिकारी,यांच्याकडे सादर करण्यात यावा अशा सूचना श्री.चंद्रकांत पाटील, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील सन २०१६ च्या कन्यागत महापर्वकाळाच्या पाश्र्वभूमीवर आयोजित आढावा बैठकीत दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सूचनेनुसार यासंदर्भातील अहवाल तयार करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालात कोणकोणत्या शिफारशी करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, उक्त कामास केव्हापर्यत सुरुवात होण्याचे अपेक्षित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०५-२०१६) :**(१) होय.

(२) होय.

(३) सदर प्रस्तावामध्ये रस्ते बांधकाम, वाहनतळ, शौचलये, भक्तनिवास, विद्युतीकरण, नदीघाट बांधणे, बसस्थानकांची सुधारणा, स्वच्छताविषयक बाबी, इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे.

(४) श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील सन २०१६ च्या कन्यागत महापर्वकाळाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कामांना शासन स्तरावरील मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समिती व मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने एकूण रु.१२१.६४ कोटी इतक्या किंमतीच्या कामांना मान्यता दिलेली आहे. त्यापैकी प्रथम टप्प्यात रु.६५.३० कोटी इतक्या किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रु.१७.५० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना वितरीत करण्यात आला आहे. सदर कामे प्रगतीपथावर आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यवतमाळ पंचायत समिती मध्ये रोजगार हमी योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(४०) ३५४४१ (१४-०१-२०१६). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ पंचायत समिती अंतर्गत सन २०११-१२ मध्ये मौजे वरझडी व वरुड या गावांमध्ये रोजगार हमी योजनेचे कोणतेही काम न करता ४० लाखांचे बनावट देयके सादर करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन गटविकास अधिकारी यांनी कागदोपत्री कामे सादर करुन कोणतेही काम न करता देयके सादर करण्याचा प्रकार जिल्हा परिषद सदस्यांच्या तक्रारीने निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी तीन वर्षाचा कालावधी लोटून अद्यापपर्यंत कुठल्याही स्वरुपाची कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२९-०३-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
सन २०१२-१३ या वित्तीय वर्षातील थकित मजुरी देयकांमध्ये अनियमितता आढळून आली आहे.
(२) अंशत: खरे आहे.
जिल्हा परिषद सदस्यांनी स्थायी समितीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने सदर बाब निदर्शनास आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) संबंधित अधिकारी/कर्मचारी यांची खाते चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच सहायक कार्यक्रम अधिकारी व पॅनल तांत्रिक अधिकारी यांचे विरुध्द मग्रारोहयो अधिनियमानुसार रु. १०००/- दंडाची कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हापरिषदेच्या एडवण येथील शाळेमधील शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(४१) ३५५२४ (१६-०१-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हा परिषदेच्या एडवण येथील शाळेमध्ये वर्षभरापासुन शिक्षकांची पदे रिक्त असल्याने अनेकवेळा पालकांनी निवेदने, तक्रारी करुनही पालघर पंचायत समितीच्या शिक्षण विभागाकडून आवश्यक ती कारवाई न झाल्यामुळे नाराज झालेल्या त्रस्त पालकांनी दिनांक २० ऑगस्ट, २०१५ रोजी शाळा बंद ठेवून आपल्या संतप्त भावना जाहीर केल्या हे खरे आहे काय,

(२) पालघर पंचायत समिती मधील शिक्षण विभागाच्या कारभारात गेल्या अनेक वर्षापासून अंधाधुंदी कारभार सुरु असून नवीन जिल्हा निर्मिती नंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी इ. सक्षम यंत्रणा पालघर मध्ये येऊनही शिक्षक बदली मधील गैरव्यवहार थांबलेला नाही त्यामुळे शाळेतील शिक्षकांच्या बदली प्रस्तावास अनेकदा प्रश्न निर्माण होऊन विद्यार्थ्यांना शाळेत शिकविण्यासाठी आवश्यक ते योग्य प्रमाणात शिक्षक उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) पालघर शहराजवळ पुर्व भागातील नवली, वेवुर, लोकमान्य नगर तसेच बोईसर जवळील शिगाव, दांडी, मान, बोईसर इ. आदिवासी बहुल ग्रामीण भागात एकस्तर वेतनश्रेणी भत्ता (विशेष घटक योजनेच्या गावात) मिळत असल्याने अधिकारी यांच्या संगनमताने अनेक शिक्षकांनी या विशेष भागातील शाळांमध्ये नियुक्ती करुन घेतल्यामुळे या भागातील फार मोठया प्रमाणात अतिरिक्त शिक्षकांचे प्राबल्य झाल्याच्या तक्रारी असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत तसेच याबाबत चौकशी करण्यात येऊन उचित कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०५-२०१६) :**(१) होय.

तथापि, शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी पालकांची समजूत घातल्याने दिनांक २१/८/२०१५ पासून शाळा नियमितरित्या सुरु झाली.

(२), (३) व (४) नवली, वेवूर, बोईसर, शिगांव या शाळांमध्ये (I) मे, २०१३ अखेर प्रशासकीय कारणास्त्व रिक्त पदांवर बदल्या झाल्याने (II) जुलै, २०१४ मध्ये पदवीधर शिक्षकांच्या नेमणूका जिल्हा स्तरावरुन झाल्याने (III) विज्ञान शाखेतील इयत्ता १२ वी उत्तीर्ण असलेल्या शिक्षकांना विज्ञान पदवीधर शिक्षक म्हणून नेमणूका देण्यात आल्या होत्या. तथापि, या शिक्षकांना अपदवीधर ठरविल्याने त्यांची गणना उप शिक्षक म्हणून करण्यात येत असल्याने शिक्षकांची पदे अतिरिक्त झालेली आहेत.

दोन्ही जिल्ह्यांची आदिवासी लोकसंख्या विचारात घेऊन या दोन्ही जिल्ह्यांचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार जुन्या एकत्रित ठाणे जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांच्या विकल्पानुसार विभाजीत ठाणे जिल्ह्यात उपलब्धतेनुसार टप्प्या टप्प्याने समायोजन करण्यात येणार आहे व अशी प्रक्रिया करतांना नवनिर्मित पालघर जिल्ह्यासाठी पदे रिक्त राहणार नाहीत या दृष्टीकोनातून पद भरती करण्यात येत आहे.

---

**तीर्थक्षेत्र पंढरपूर(जि.सोलापूर) येथील चंद्रभागा नदीवरील उड्डाणपुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(४२) ३५५५४ (२२-१२-२०१५). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तीर्थक्षेत्र पंढरपूर(जि.सोलापूर) येथील चंद्रभागा नदीवरील पुंडलिक मंदीर ते शेगांव(दु) या ठिकाणी पुल बांधणेचे काम प्रस्तावित असून ते मंजूर होऊन सुरू न झाल्यामुळे भाविकांची गैरसोय होत आहे. तसेच सदरचे काम सुरू करावे म्हणून महाराज मंडळीसह वारक-यांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास चंद्रभागा नदीतीरावर आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सदर उड्डाण पुल बांधण्याच्या कामासाठी निधी उपलब्ध करून प्रत्यक्ष काम सुरू करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०६-०५-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) तहसीलदार ता.पंढरपूर यांनी लेखी पत्र देऊन आंदोलन मागे घेण्याबाबत विनंती केली होती. त्यानुसार आंदोलनकर्त्यांनी आंदोलन मागे घेतले.

(३) व (४) श्री.क्षेत्र देहू, आळंदी, पंढरपूर भंडारा डोंगर, नेवासा पालखी तळ विकास आराखड्यांतर्गत चंद्रभागा नदीवर पादचाऱ्यांकरीता लोखंडी पुल उभारण्याचे प्रस्तावित आहे. सदर आराखड्याची अंमलबजावणी यंत्रणा विभागीय आयुक्त, पुणे हे असून यांच्यामार्फत तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांच्यामार्फत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**रावेर (जि.जळगांव) तालुक्यातील ग्रामीण व इतर जिल्हा मार्गांची झालेली दुरवस्था**

**(४३) ३६०८२ (२०-०१-२०१६). श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगांव) तालुक्यातील ग्रामीण व इतर जिल्हा मार्गांची दुरवस्था झाली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास सदर ग्रामीण व इतर जिल्हा मार्गाचे मजबुतीकरण व डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०५-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) संपूर्ण राज्यामध्ये जिल्हा परिषदांच्या अखत्यारितील ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग रस्त्यांची सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार एकूण लांबी २३६८९०.०४ कि.मी. इतकी असून अस्तित्वातील लांबी १९०९५५.२२ कि.मी. इतकी आहे.

सदर रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी शासनाकडे उपलब्ध असलेल्या निधीचे वाटप रस्त्यांच्या लांबीच्या व मानव विकास निर्देशकाच्या प्रमाणात करण्यात येते. त्यानुसार जळगाव जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामीण मार्ग व इतर जिलहा मार्ग रस्त्यांची एकूण लांबी ८३३६.०४ कि.मी इतकी असून अस्तित्वातील लांबी ८३३०.०५ कि.मी. इतकी आहे.

रस्ते व पूल, दुरुस्ती व परीरक्षण या कार्यक्रमा अंतर्गत सन २०१२-१३ ते २०१४-१५ या आर्थिक वर्षासाठी जळगाव जिल्हा परिषदेस एकूण रु.२६२०.३१ लक्ष, तेराव्या वित्त आयोगामध्ये सन २०१२-२०१३ ते २०१४-१५ मध्ये एकूण रु.९८४.९९ लक्ष तर पूरहानी कार्यक्रमासाठी जळगाव जिल्हा परिषदेला रु.५७४.४० लक्ष असा एकूण रु.४१७९.७० लक्ष इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

रस्ते लांबीच्या प्रमाणात विभागास उपलब्ध होणारा निधी अत्यंत अल्प आहे. याउलट शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या मागण्या जास्त आहेत. जिल्हा परिषदेकडील मैलमजूरांमार्फत तसेच जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषास अधिन राहून प्रश्नांकित रस्ते सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न जिल्हा परिषदेकडून केला जातो.

---

**अपंग कर्मचा-यांना साहित्यापासून वंचित रहावे लागत असल्याबाबत**

**(४४) ३६३२९ (१८-०१-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हा परिषदेतील कार्यरत अपंग कर्मचा-यांना मागील चार वर्षापासून हक्काच्या साहित्यापासून वंचीत राहावे लागत असल्याबाबतची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय अपंग कर्मचा-याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी उच्च न्यायालयाने राज्य शासनाला अपंगाना साहित्य वाटपाचे आदेश दिले होते व त्यानुसार बांधकाम, आरोग्य, विभागीय आयुक्त, आदी विभागातील कर्मचा-यांना साहित्य पुरविले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विभागातील अपंग कर्मचा-यांच्या संख्येनुसार निधीसाठी प्रस्ताव तयार करुन मुख्य कार्यकारी अधिका-यांकडे दिला जात असून त्यानंतर सर्व प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येतो परंतु सन २०१२ मध्ये मंजुर ३६ अपंग कर्मचा-यांना साहित्यासाठीचा प्रस्ताव तयार करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्ताव तयार करुन शासनाकडे न पाठविणा-या अधिका-यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०५-२०१६) :**(१) नाही.
(२) होय.
(३) जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत १९० अपंग कर्मचारी असून त्यापैकी १४६ कर्मचाऱ्यांनी उपकरणांची मागणी नोंदविलेली आहे. आतापर्यंत १११ कर्मचाऱ्यांना साहित्य वाटप करण्यात आलेले आहे. ३३ अस्थिव्यंग कर्मचाऱ्यांनी स्कुटरविथ अडॉप्शनची मागणी केली आहे. उपरोक्त उपकरणासाठी आवश्यक निधीचा प्रस्ताव संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाकडे सादर केला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली (ता.शिराळा) जिल्हयातील वाकुर्डे (बु.) उपसा जलसिंचन योजना दीर्घकाळ अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४५) ३६७६३ (१५-०१-२०१६). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली (ता.शिराळा) जिल्हयातील वाकुर्डे (बु.) उपसा जलसिंचन योजना १९९९ पासून प्रशासकीय मान्यता मिळवूनही अद्याप तिस-या टप्प्यातील कामे व उर्वरित कालव्याची कामे बाकी आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजना लवकर कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या निधीतून या योजनेसाठी किमान रुपये १५० कोटींच्या निधीची तरतूद करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक २० ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देवून विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू योजना कार्यान्वित करण्याच्या बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०४-२०१६) :**(१) होय.
(२) होय.
दिनांक ३०/१०/२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त आहे.
(३) दिनांक ३०/१२/२०११ रोजी योजना भाग १ टप्पा १ व २ कार्यान्वित करुन ३२५२ हेक्टर सिंचन क्षमता निर्मीती झाली आहे. या योजनेस सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रु.१२ कोटी इतकी तरतूद असून निधीच्या उपलब्धतेनुसार या योजनेचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शनिशिंगणापूर येथील विकास आराखडा तयार करुन निधी देण्याबाबत**

**(४६) ३६७७९ (१४-०१-२०१६). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शनिशिंगणापूरच्या विकास कामांसाठी निधी कमी पडत असून १०० कोटी रुपयांचा विकास आराखडा तयार करण्याच्या सूचना मा.अर्थमंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.वित्त मंत्र्यांच्या सूचनेनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मुळा कालव्याच्या शेजारी देवस्थानाच्या वतीने जमीन खरेदी करण्याचा प्रस्ताव पाटंबधारे विभागाकडे मंजूरीसाठी प्रलंबित असून त्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, भाविकांना सोयीसुविधा देण्यासाठी देहू, आळंदी व पंढरपूरच्या धर्तीवर शनिशिंगणापूर येथील विकास आराखडा तयार करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

परंतु मा.मंत्री (वित्त) यांनी सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये राज्यातील विविध तीर्थक्षेत्राच्या विकासाकरीता रु.१२५ कोटी इतका नियतव्यय चिन्हांकित केला आहे. सदर तीर्थक्षेत्रांमध्ये श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर, जि.अहमदनगर या तीर्थक्षेत्राचा समावेश आहे.

(२) नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/१४४४, दिनांक ४ जून, २०१५ मधील तरतूदीनुसार श्रीक्षेत्र शनिशिंगणापुर, जि.अहमदनगर या तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा जिल्हास्तरीय समितीमार्फत शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी अहमदनगर यांना कळविण्यात आले आहे.

(३) व (४) मुळा कालव्याशेजारी देवस्थानच्या वतीने जमीन खरेदी करण्याचा कोणताही प्रस्ताव पाटबंधारे विभागाकडे मंजूरीसाठी प्रलंबित नाही. परंतु मुळा उजवा कालव्यावरील विमोचन क्र. १८ सर्व्हे नंबर १८६/२ येथे श्री.शनिशिंगणापूर देवस्थानास कालव्यासाठी संपादित झालेल्या जागेमध्ये देवस्थानच्या विनंतीनुसार भाविकांच्या पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी खास बोअरवेल घेण्यासाठी मुळा पाटबंधारे विभागाने दिनांक १५/७/१९९६ च्या पत्रान्वये अटी व नियम यांचे अधिन राहून परवानगी दिलेली आहे. सदर बोअरवेलच्या आसपासची अंदाजे ३५ गुंठे जमीन देवस्थानने ९९ वर्षासाठी खंडाने किंवा भाडेपट्ट्याने कायमस्वरुपी वापरण्यास मिळावी असा अर्ज केला होता. परंतु सदन जमिनीचे मूळ मालक श्री.बाबासाहेब शिंदे, रा.पानसवाडी, ता.नेवासा व श्री.शनिशिंगणापूर देवस्थान यांचेमध्ये वाद निर्माण झाल्याने श्री. शिंदे यांनी नेवासे येथील न्यायालयात दावा दाखल केला आहे. सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने सदर जमिन कोणासही भाडेतत्वावर किंवा खंडाने देणे शक्य होणार नाही असे श्री.शनिशिंगणापूर देवस्थानास कळविण्यात आले आहे. तसेच जलसंपदा विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक ६ एप्रिल, २००५ च्या पत्रानुसार शासनाकडील संपादित जमिन खाजगी संस्थांना लिजवर / भाडेपट्ट्याने देण्यात येऊ नये असे आदेश आहेत.

त्याप्रमाणेदेखील श्री.शनिशिंगणापूर देवस्थानास कळविण्यात आले आहे. सबब, प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने परिस्थती जैसे थे आहे. नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.५/१४४४, दिनांक ४ जून, २०१५ मधील तरतूदीनुसार श्रीक्षेत्र शनिशिंगणापूर, जि.अहमदनगर या तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा जिल्हास्तरीय समितीमार्फत शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी अहमदनगर यांना कळविण्यात आले आहे.

---

**मौजे पद्मावती (ता. भोकरदन, जि.जालना) येथील धरण प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत**

**(४७) ३६७८० (१४-०१-२०१६). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पद्मावती (ता.भोकरदन, जि.जालना) येथील धरण प्रकल्पग्रस्ताना एकदा स्थलांतरीत केले असता दुसऱ्यांदा धरणाची उंची वाढविल्यामुळे पुनर्वसन केलेल्या गावठाणात धरणाचे पाणी शिरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणप्रकल्पग्रस्तांनी याबाबत पुर्नविस्तापितासाठी जिल्हाधिकारी, जालना यांना दिनांक १९ एप्रिल, २०१४ रोजी निवेदनाव्दारे पुनर्वसनाची मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०४-२०१६) :**(१) हे खरे नाही

धरणाच्या सांडव्याच्या उंचीवाढीचे काम अद्‌याप झालेले नाही.

(२) होय, संबंधित प्रकल्पग्रस्तांनी त्यांचे बाधित झालेल्या घरांच्या पुनर्वसनासाठी दि.१९/०९/२०१४ च्या निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे मागणी केली आहे.

(३) मासरुळ प्रकल्पाच्या मंजूर द्वितीय सुप्रमा अहवालातील तरतुदीनुसार सांडव्याच्या ०.६०मी. एवढे उंचीकरण प्रस्तावित आहे. उंचीकरणानंतर गावठाणातील पूर्वीची पुनर्वसीत घरे व धरणाची नवीन पूर्ण संचय पातळीचे दरम्यान ३ मी. उंचीचा मातीबांध बांधणे प्रस्तावित आहे. प्रकल्पांचा तृतीय सुप्रमा प्रस्ताव विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचेकडून मंजूर झाल्यानंतर नमूद बाधित होणाऱ्या घरांची संरक्षणविषयक कामे हाती घेतली जाणार आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मांगीतुंगी (ता.बागलाण, जि.नाशिक) येथे मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत**

**(४८) ३६७८२ (१४-०१-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांगीतुंगी (ता.बागलाण, जि.नाशिक) येथे साकारण्यात येत असलेल्या भगवान ऋषभदेव महाराज यांच्या पूर्णाकृती मूर्तीच्या माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान प्रतिष्ठापना सोहळयाच्या पार्श्वभूमिवरील पावणे तीनशे कोटींच्या विकास आराखडयाला शासनाने अद्यापही मंजूरी दिलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विकास आराखडयाला मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या सोहळयाला राज्यातील नव्हे तर जगभरातून मोठया संख्येने जैन भाविक येणार असल्याने येथे मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (३०-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी झालेल्या बैठकीत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी श्रीक्षेत्र मांगीतूंगी येथे करण्यात येणाऱ्या कामांचा रु.२७५.०० कोटी एवढ्या रकमेचा आराखडा सादर केला होता. परंतु सदर आराखड्यापैकी तातडीच्या व सोहळ्याकरीता आवश्यक असलेल्या कामांचा आराखडा सादर करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी जिल्हधिकारी, नाशिक यांना सूचना दिल्या होत्या. त्यानुसार जिल्हाधिकारी नाशिक यांनी तातडीच्या कामांचा रु. ४०.०० कोटी एवढ्या रकमेचा आराखडा शासनास सादर केला. सदर आराखड्यास नियोजन विभाग शासन निर्णय दिनांक ४ जून, २०१५ मधील तरतूदीनुसार मा.मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकारी समितीने व मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीने मंजूरी दिली आहे. त्यापैकी प्रथम टप्प्यात रु. १८.५८ कोटी इतक्या निधीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर निधी जिल्हाधिकारी, नाशिक यांना वितरीत करण्यात आला आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सदर सोहळ्याकरीता येणाऱ्या भाविकांकरीता स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, महत्वाच्या व्यक्तींकरीता हेलिपॉड, श्रीक्षेत्र मांगीतुंगी येथे जाण्याकरिता रस्त्याचे रुंदीकरण, सुरक्षेकरीता पोलीस चौक्या व सी.सी.टिव्ही यंत्रणा, वैद्यकीय व्यवस्था, आपत्कालीन व्यवस्थापन, निरीक्षण मनोरे, वाहनतळ व्यवस्था, ध्वनीक्षेपण व्यवस्था, रस्ते रुंदीकरण, रस्त्यावर विद्युतीकरण, रेलिंग सूचना फलक, मुर्ती परिसरात जीने इत्यादी सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

---

## अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील निळवंडे धरणातील मुख्य कालवे व उच्चस्तरीय पाईप कालव्याचे काम निधी अभावी अपूर्णावस्थेत असल्याबाबत

**(४९) ५१४०५ (२८-०४-२०१६). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले (जि.अहमदनगर) तालुक्यातील निळवंडे धरणाचे ९० टक्के काम पूर्ण झाले असताना मुख्य कालवे व उच्चस्तरीय पाईप कालव्याचे काम निधी अभावी अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार सदर धरणाचे अपूर्ण काम, मुख्य कालवे, उच्च स्तरीय पाईप कालव्याच्या कामास तातडीने निधी उभारुन धरणाचे काम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२१-०६-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) प्रकल्पाचा रुपये २४६९.१४ कोटी किंमतीचा चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

निळवंडे धरणाची स्थापत्य कामे पूर्ण झालेली आहेत. निळवंडे प्रकल्पाच्या कालव्याची कामे प्रगतीपथावर असून उजव्या कालव्याचे काम ११ टक्के व डाव्या कालव्याचे काम ३० टक्के पूर्ण झालेले आहे. निधीच्या उपलब्धतेनुसार कालव्याची कामे व उच्च स्तरीय कालव्याची कामे प्रगतीपथावर आहेत.

सन २१०५-२०१६ साठी प्रकल्पास रुपये ५१.०० कोटी अनुदान उपलब्ध केले होते.

सन २०१६-२०१७ मध्ये निळवंडे प्रकल्पाकरीता रुपये १३.०० कोटी (धरणासाठी रुपये १०.०० कोटी व कालव्यासाठी रुपये ३.०० कोटी) अनुदानाची तरतुद आहे.

उच्च स्तरीय पाईप कालव्यासाठी नाबार्ड २१ अंतर्गत रुपये ६४.६० कोटी किंमतीच्या प्रस्तावास शासन मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जलसंपदा विभागाला प्रलंबित प्रकल्पासाठी ७२७२ कोटी मंजूर करुन निधी वितरित करण्याबाबत

**(५०) ५२२३६ (१५-०३-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान जलसंपदा विभागाला प्रलंबित प्रकल्पासाठी ७२७२ कोटी मंजूर करुन निधी वितरित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा निधी राज्यातील कोणकोणत्या प्रकल्पावर मंजूर करण्यात आलेला आहे, व आतापर्यंत कोणत्या प्रकल्पावर किती खर्च करण्यात आलेला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०४-२०१६) :**(१) सन २०१५-१६ या वर्षात वित्त विभागाकडून जलसंपदा विभागास एकूण रु.७२७२.०३ कोटी इतका निधी वितरणासाठी उपलब्ध झाला, हे खरे आहे. त्यापैकी विविध महामंडळाकडील विविध स्त्रोतांतर्गत प्रकल्पांच्या कामाकरीता रु.६६०१.२२५७ कोटी, जलविदयुत प्रकल्पांच्या कामाकरीता रु.३४९.९५३८ कोटी व उर्वरित रु.३२०.८५०५ कोटी इतका निधी विविध योजनांतर्गत आस्थापना, खारभूमी योजना, जलविज्ञान, यांत्रिकी कामे, ई-गव्हर्नन्स, सामायिक योजना, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प इत्यादी करीता आहे.
(२) व (३) याबाबतची माहिती संलग्न विवरणपत्र प्रधान सचिव यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.